**Bachelor of Science (B.Sc.) Semester—II (CBS) Examination**

**MARATHI**

**Compulsory Paper—2**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 60

सूचना :— (1) सुवाच्च अक्षरे, मुहदेसुद उत्तरे आणि शुद्धलेखन अपेक्षित.

(2) **सर्व** प्रश्न अनिवार्य.

1. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा (**200** शब्दात) :

(i) जागतिक तापमान वाढ : एक समस्या

(ii) मी पंतप्रधान झालो तर ! 12

2. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा (**200** शब्दात) :

संत तुकारामांविषयी सदानंद मोरेंची भूमिका स्पष्ट करा.

**किंवा**

स्त्री-पुरुष समानतेविषयी अरूणा सबाने यांची विचारसरणी स्पष्ट करा. 12

3. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा :

जागतिकीकरणाच्या युगात नवी पिढी नैतिक मूल्यांपासून दूर जात आहे असे कवी श्रीकृष्ण शकत यांना का वाटते ?

**किंवा**

शब्दांच्या विविध रूपांचे वर्णन कवीने कसे केले आहे. 12

4. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(अ) 'सत्य कुणीही शोधू शकते' असे लेखकाला का वाटते ?

**किंवा**

सर्व शिक्षा अभियानाचे विडंबनात्मक वर्णन रमेश रंगळे यांनी कसे केले आहे ? 3

(ब) संजीवनी तडेगावकर यांनी स्त्री-वात्सल्य भावनेचे वर्णन कसे केले आहे ?

**किंवा**

'गाव जुने शेणा-मातीचे' या कवितेचा थोडक्यात आशय स्पष्ट करा. 3



rtmnuonline.com

(क) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

(i) वेसण घालणे

(ii) पोटाला चिमटा घेणे

(iii) गाढवाचा नांगर फिरवणे. 3

(ड) खालील शब्द शुद्ध करून पुन्हा लिहा :

(i) परिकशा

(ii) जिर्ण

(iii) सुचना

(iv) वैकल्पीक

(v) आदरणिय

(vi) करतूत्व. 3

5. (अ) खालील उताऱ्याचा सारांश तुमच्या शब्दात लिहा :

केशवसुतांचा नवा शिपाई मला साने गुरुजींमध्ये दिसला. साकल्याच्या प्रदेशातला हा फार थोर प्रवासी. जीवनाच्या किती निरनिराळ्या अंगात ते रमले होते. साने गुरुजींच्या डोळ्यांत अश्रू येत असत. मी तर म्हणतो की तसले अश्रू येण्याचे भाग्य एकदा जरी तुमच्या आयुष्यात लाभले तरी क्षण खऱ्या अर्थाने आपण जगलो असे म्हणा. साने गुरुजी नुसते रडले नाहीत. प्रचंड चिडले. ते रडणे आणि ते चिडणे सुंदर होते. त्या चिडव्यामागे भव्यता होती. गुरुजी केवळ साहित्यासाठी साहित्य किंवा कलेसाठी कला असे मानणाऱ्यातले नव्हते. जे जे काही आहे ते जीवन अधिक सुंदर करण्यासाठी आहे, अशी त्यांची श्रद्धा होती आणि त्या श्रद्धेपोटी लागणारी किंमत गुरुजी देत होते. तुकारामांच्या शब्दांत बोलायचे म्हणजे — तुका म्हणे व्हावी प्राणासवे आटी

नाही तरी गोष्टी बोलू नये. 4

(ब) नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तुमच्या मोठ्या भावाला अभिनंदन पर पत्र लिहा. 4

(क) माहितीच्या अधिकाराचे महत्त्व विशद करा. 4



rtmnuonline.com